Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

**विद्यार्थी विकास विभाग**

**Dr. S. G. Ghane**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**


संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/439 दि. 11 MAY 2026

प्रति,
मा. प्राचार्य /प्रमुख,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण, संस्था
मा. अधिविभागप्रमुख, सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय:— सन २०२६—२०२७ या शैक्षणिक वर्षाचे अविष्कार शुल्क पाठविणेबाबत.**

महोदय,/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात, आपणांस कळविण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार सन २०२५—२०२६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांकडून **प्रति विद्यार्थी रू. २०/— इतके अविष्कार शुल्क घेण्यात यावे.** सदर जमा रक्कमेतून **प्रति विद्यार्थी रू. १५/— प्रमाणे जमा होणारी रक्कम संलग्नता विभागामार्फत दिलेल्या परिपत्रकामधील तारखांनुसार प्रथम सत्र संपण्यापूर्वी विद्यापीठामध्ये अंदाजपत्रकीय शिर्षक A.48.R.10 या खाती ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी** ही विनंती. तसेच भरलेल्या निधीची पावती या कार्यालयास त्वरीत जमा करण्यात यावी. याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सदर निधी भरणे प्रत्येक महाविद्यालयास अनिवार्य आहे.

उर्वरीत रक्कम रु. ५/— प्रमाणे जमा होणारी रक्कम आपल्या महाविद्यालयामार्फत अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये सहभागी होणा—या विद्यार्थ्यांच्या खर्चासाठी वापरावयाची आहे. **जर आपले महाविद्यालय जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा कार्यशाळा, जिल्हास्तरीय व विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये सहभागी झाले नाही तर महाविद्यालयाकडे जमा होणारी प्रती विद्यार्थी रु. ५/— प्रमाणे रक्कम विद्यापीठाकडे वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदरची रक्कम वर्ग करण्यात यावी.**

शैक्षणिक वर्ष २०२६ — २०२७ मध्ये आपल्या महाविद्यालयात एका अविष्कार समन्वयकांची नेमणुक करुन जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा कार्यशाळा, जिल्हास्तरीय व विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्याबाबत प्रेरीत करावे. हि विनंती.

तसेच बऱ्याच महाविद्यालयामार्फत संपूर्ण प्रवेशित विद्यार्थ्यांचा निधी भरला जात नाही. विद्यापीठामध्ये प्रती विद्यार्थी भरलेली रक्कम व महाविद्यालयामार्फत ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) या पोर्टलवर नमुद केलेली विद्यार्थी संख्या यामध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) च्या पोर्टलवर नमुद केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार सदर निधी जमा करावयाचा आहे.

कळावे,

आपला विश्वासू

Ghane
11/05/26

संचालक
विद्यार्थी विकास